# साहित्य संमेलन कोकणचा मानबिंदू ठरेल-दळवी

**दापोली** *(प्रतिनिधी)*

रत्नागिरी जिल्ह्यात २२ वर्षांनी अ. भा. मराठी साहित्य संमेलन होण्याचा योग जुळून आला आहे. यानिमित्त कोकणचे साहित्यिक आणि सांस्कृतिक प्रतिबिंब या संमेलनावर पडावे. तसेच हे संमेलन कोकणसाठी मानबिंदू ठरेल, असा आशावाद दापोलीचे आमदार सूर्यकांत दळवी यांनी व्यक्त केला.

येथील पेन्शनर्स असोसिएशन सभागृहात झालेल्या सहविचार सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मनसेचे जिल्हाध्यक्ष संतोष शिर्के, भाजपा तालुकाध्यक्ष केदार साठे, अरूण इंगवले, श्रीराम दुर्गे, धनंजय चितळे आदी उपस्थित होते. सुरुवातीला लोकमान्य टिळक वाचन मंदिर चिपळूणतर्फे संमेलनाची ढोबळ रुपरेषा सांगण्यात आली. जानेवारी २०१३ मध्ये होणाऱ्या या संमेलनासाठी व्यापक जागृती व्हावी, तसेच सहकार्य मिळावे, यासाठी आयोजकांच्या वतीने सहविचार सभा घेण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या बैठकित आ. दळवी बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, संमेलनासाठी आवश्यक सहकार्य केले जाईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. यासाठी आपल्या सीनेक्षेत्रातील नामवंत कलादिग्दर्शक कोकणचे सुपुत्र नितीन देसाई यांची मदतही घेता यईल, असे ते म्हणाले. या संमेलनातून कोकणातील कला संस्कृतीचे दर्शन होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.



अ. भा. मराठी साहित्य संमेलन दापोली सहविचार सभेत बोलताना अरूण इंगवले, व्यासपीठावर आमदार सूर्यकांत दळवी, केदार साठे, संतोष शिर्के, श्रीराम दुर्गे, धनंजय चितळे आदी.

यातून संमेलनासाठी मार्गदर्शक सूचना मिळत असून, त्यामुळे कोकणचे आणि रत्नागिरी जिल्ह्याचे परिपूर्ण प्रतिबिंब या संमेलनात पडेल, असा आशावाद आयोजन समितीचे अरूण इंगवले यांनी व्यक्त केला. संमेलनासाठी येणाऱ्या सुमारे २ हजार प्रतिनिधींना कोकणातील झाडांच्या बिया भेट दिल्या जाणार असून, त्यांच्या परिसरात ही झाडे उगवावीत, असा मानस आहे, असेही ते म्हणाले.

यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष केदार साठे म्हणाले की, हे संमेलन कोकणात आणि त्यात रत्नागिरी जिल्ह्यात होणे ही सर्व रत्नागिरीकरांसाठी आनंदाची आणि औत्सुक्याची बाब आहे. यामुळे हे संमेलन यशस्वी करण्यासाठी जी मदत करता येईल, ती आम्ही निश्चित करू.

यावेळी बोलताना कोकण कृषी विद्यापीठाचे माजी विस्तार शिक्षण संचालक डॉ. अशोक निर्बाण यांनी अशाच स्वरुपाचे उपक्रम राबविण्याचा आमचा अनुभव असून, या बिया उपलब्ध करून देण्याचे काम मी स्वतः करेन, यासाठी कोकण कृषी विद्यापीठाचे सहकार्य निश्चित मिळेल, अशी ग्वाही दिली.मनसेचे जिल्हाध्यक्ष संतोष शिर्के यांनी या संमेलनास सर्वतोपरी मदत करू, असे आश्वासन देतानाच अशी संमेलने ही समाजमनाची प्रगल्भता वाढविण्यासाठी गरजेची असतात, असे मत व्यक्त केले. ज्येष्ठ साहित्यिक इक्बाल मुकादम यांनी या संमेलनात कोळी बांधवांच्या संस्कृतीचेही प्रतिबिंब पडावे, त्यांची नृत्ये, गीते यानिमित्त पाहुण्यांना अनुभवता येतील, असे मत व्यक्त केले. यावेळी कवी प्रा. कैलास गांधी, सुनील कदम, काफ्ताचे अध्यक्ष संदेश मोरे, प्रसाद रानडे, संदेश राऊत, मंगेश मोरे, मुश्ताक खान, दिगंबर पावसे, सुहास मातोंडकर अभिजीत भोंगले, शांत कांबळे, सचिन बैकर, राजेंद्र दाभोळकर, प्रा. संतोष मराठे, विष्णू सोमण उपस्थित होते.

## अमेरिकेतूनही साहित्यिक येणार

### उद्योजक मंदार जोगळेकर यांचे संयोजन समितीला आश्वासन

**चिपळूण** *(शहर वार्ताहर)*

आम्ही मंडळी अमेरिकेत वास्तव्याला असलो तरी मराठीपण टिकवून आहोत. कोकणातील असंख्य तरूण आज जगभर गेले आहेत. त्यांनाही कोकणची ओढ आहेच. चिपळूणला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे. त्यावेळी देशातील मराठी बांधव उपस्थित राहतील. त्यासाठी आम्ही संपर्क अभियानही सुरू केले आहे. या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसादही दिला आहे. आम्ही येणारच आहोत अशा शब्दात अमेरिकेतील एक उद्योजक मंदार जोगळेकर यांनी संयोजन समितीच्या सदस्यांना आश्वासन दिले.

'बुकगंगा डॉट कॉम'च्या माध्यमातून हजारो मराठी ग्रंथ वाचकांपर्यंत नेण्याचा भव्य उपक्रम करणारे मंदार जोगळेकर हे मूळचे संगमेश्वर तालुक्यातील साखरपा गावच. संमेलनाबद्दल सविस्तर माहिती घेण्यासाठी त्यांनी संमेलन कार्यालयाला भेट दिली. यावेळी संमेलनाचे कार्यवाह धनंजय चितळे यांनी सविस्तर माहिती दिली. संमेलन यशस्वी होण्यासाठी संघटीत केलेल्या विविध समित्यांची तसेच सर्व स्तरातून मिळणारा पाठिंबा याची माहिती दिली.

मंदार जोगळेकर यांनी संमेलनाच्या कार्यक्रमाचे चित्रण जगभर मराठी बांधवांना पाहता यावे, यासाठी 'बुकगंगा' संस्था सर्वोतोपरी सहाय्य करेल. तसेच संमेलनाला परदेशस्थ अर्थसहाय्य करतील यासाठी अमेरिकेतील आम्ही एकत्र येऊन प्रयत्न करू, असे सांगितले. कार्यवाह अरूण इंगवले, मधुसुदन केतकर, रमेश चिपळूणकर यांनी चर्चेत भाग घेतला. सारे चिपळूणकर एकजुटीने संमेलन यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील आहेत, याचा आनंद व्यक्त करून श्री. जोगळेकर यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. रमेश चिपळूणकर यांनी आभार मानले.